SL. No. : DD

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 50 ]
Total No. of Questions : 50 ]

**CCE RR**
**UN-REVISED**

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 8
[ Total No. of Printed Pages : 8

ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M**

**Code No. : 08-M**

# ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

# Subject : First Language — MARATHI

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ / New Syllabus )**

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Regular Repeater )**

ದಿನಾಂಕ : 23. 03. 2018 ]
[ Date : 23. 03. 2018

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 09-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 12-30 ರವರೆಗೆ ]
[ Time : 09-30 A.M. to 12-30 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100 ]
[ Max. Marks : 100

## विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तूनिष्ठ प्रकारचे 50 प्रश्न आहेत.

2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परोक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.

3. बहूपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नासाठी दिलेल्या सुचनांचे पालन करा.

4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.

5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठो 15 मिनिटेही दिलेली आहेत.

येथून कापा.

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.

**Tear here**

## विभाग-A

### ( गद्य पद्यांशावर आधारीत )

I. खालील प्रश्नांची प्रत्येकी **एका** वाक्यात उत्तरे लिहा. $11 \times 1 = 11$

1. मुसळा सारखा हत्ती कोणाला वाटला ?

2. हत्तीचा दृष्टांत स्वामीनी म्हाइंभटास कोठे सांगितला ?

3. डॉ० आंबेडकर विद्येची पूजा किती तास करत ?

4. चि. वि. जोशींच्या मानसपुत्राची नांवे काय ?

5. काकूनी सोवळ्याच्या गाठोडयात काय लपविले होते ?

6. 'हकिकत' हा पाठ कोणत्या पुस्तकातून निवडला आहे ?

7. उत्तम कांबळे उडया मारत घरी केव्हा आले ?

8. उत्तम कांबळेच्या आईचे नाव काय ?

9. कवि 'मुकुंदराज' कोणाचा जयजयकार करतात ?

10. रूक्मिणीच्या गुरुचे नाव काय ?

11. माहेर कशाप्रमाणे आहे ?

II. खालील प्रश्नांची उत्तरे **तीन-चार** वाक्यात लिहा. 6 × 2 = 12

12. 'अपार वेदना व त्रास सोसून मी विद्यासंपादन केली.' संदर्भासह स्पष्ट करा.

13. केशव मेश्रामच्या मित्राच्या घरी जेवणाचा कोणता बेत होता ?

14. गंगूबाईंच्या गळ्यावर शस्त्रक्रिया का झाली ? त्याचा परिणाम काय झाला ?

15. संत ज्ञानेश्वरांचा परिचय लिहा.

16. पाहुणे कोठून आले असे आई मुलाला सांगते ?

17. 'अवकाश कवटाळून सुद्धा तिचे हात रिकामे.' असे का म्हटले आहे ?

III. खालील प्रश्नांची उत्तरे **पाच-सहा** वाक्यात लिहा. 8 × 3 = 24

18. वसईच्या किल्ल्यातील भेद जाणून घेण्यासाठी कोणी-कोणी कसे प्रयत्न केले ?

19. लेखकाने पावसाळ्याचा हिशेब कसा घातला आहे ?

20. 'जपानी स्त्री' बद्दल थोडक्यात माहिती लिहा.

21. वाटणीच्या घोळाने घरात काय घडत होते ? तिसरी वाटणी कोणी मागितली ?

22. ढोंगी साधूचे वागणे कसे असते ?

23. कृष्ण, कर्ण, सौभद्र यांचे दाखले स्पष्ट करा.

24. पृथ्वी सूर्याकडे प्रेमाची याचना कशी करत आहे ? तिची आजची अवस्था काय आहे ?

25. 'धरण' कवितेतील 'स्त्री' ची व्यथा लिहा.

IV. खालील प्रश्नांची उत्तरे **आठ-दहा** वाक्यात लिहा. 5 × 4 = 20

26. 'हिरवे सांगाती' या पाठातील चाफा, बहावा, पपया व बांबू या झाडाविषयी माहिती द्या.

27. सावित्रीबाईना शिकविताना आलेल्या अडचणी लिहा.

28. पहिल्या तृणपात्याचा सत्कार का व कसा केला ?

29. काया मातीत कवितेतील निसर्ग वर्णन करा.

30. पुढील कवितेच्या ओळी पूर्ण करा.

हे सर्व पंथ ..............................................

..............................................................

..............................................................

............................ वसू दे, दे वरचि असा दे ।।

**विभाग-B**

**( व्याकरणावर आधारोत )**

V. खालील पर्यायातून योग्य उत्तर निवडून लिहा. 10 × 1 = 10

31. 'सदानंद' ही प्रकारची संधी आहे.

(अ) स्वर संधी (ब) व्यंजन संधी

(क) विसर्ग संधी (ड) यापैकी नाही

32. 'अष्टमी' विभक्तीचे हे प्रत्यय आहेत.

(अ) ने, इ, शी (ब) प्रत्यय नाहीत

(क) ना (ड) त, ई, आ

33. रिया आंबा खाते. या वाक्यात हा प्रयोग आहे.

(अ) कर्तरी (ब) कर्मणी

(क) भावे (ड) यापैकी नाही

34. "मधुरा शाळेला आली". या वाक्यात हा काळ आहे.

(अ) रीती वर्तमान काळ (ब) साधा भूतकाळ

(क) अपूर्ण वर्तमान काळ (ड) पूर्ण वर्तमान काळ

35. कानामागून आली नि अशी झाली.

(अ) तिखट (ब) गोड

(क) आंबट (ड) कानाला चावली

36. 'तू खेळ पण अभ्यास कर.' हे या प्रकारचे वाक्य आहे.

(अ) केवल वाक्य (ब) उद्‌गारार्थी वाक्य

(क) संयुक्त वाक्य (ड) मिश्र वाक्य

37. 'पापपुण्य' हा या प्रकारचा समास आहे.

(अ) वैकल्पिक द्वंद्व (ब) इतरेतर द्वंद्व

(क) समाहार द्वंद्व (ड) द्विगू

38. 'पाण्यात विहार करणारे' याला एक शब्द हा आहे.

(अ) भूचर (ब) जलचर

(क) खग (ड) उभयचर

39. 'केदार आणि रिया वेगात मैदानावर धावले' यातोल 'वर' या अधोरेखित शब्दाची जात ही आहे.

(अ) शब्दयोगी अव्यय (ब) उभयान्वयी अव्यय

(क) क्रियापद (ड) क्रिया विशेषण

40. भारत चहा साखर कच्चे लोखंड नि अभ्रक निर्यात करतो. या वाक्यात स्वल्प विराम इतक्या वेळा वापरावा.

(अ) एक (ब) दोन

(क) तीन (ड) चार

VI. खालील दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा. $4 \times 1 = 4$

41. सुख : दुःख : : स्वदेश : .............

42. मुलगा : मुलगी : : विधवा : .............

43. हरणाचा : कळप : : फुलांचा : .............

44. तूप : कन्नड : : समारोह : .............

VII. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. $3 \times 2 = 6$

45. 'गंगेपरि पवित्र ठेवा मनी विचार'

अलंकार ओळखून लक्षण सांगा.

46. 'मेघांनी हे गगन भरता गाढ आषाढ मासी'

वरील ओळीचे गण पाडून वृत्त ओळखा.

47. पुढील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

i) आकाश पाताळ एक करणे

ii) गयावया करणे.

## विभाग-C
## ( लेखन व रचनेवर आधारोत )

VIII. 48. खालीलपैकी **एका** कल्पनेचा विस्तार करा. $1 \times 3 = 3$

(i) जशास तसे

(ii) धीर धरी रे धीरापोटी असती मोठी फळे गोमटी.

IX. 49. तुम्ही पाहिलेल्या प्रेक्षणोय स्थळाचे वर्णन करणारे मित्राला / मैत्रिणीला पत्र लिहा. 1 × 5 = 5

**किंवा**

आई / वडिलांना तुमच्या पुढील शिक्षणाबद्दल माहिती सांगणारे पत्र लिहा.

X. 50. खालीलपैकी एका विषयावर **15** ते **20** ओळीत निबंध लिहा. 1 × 5 = 5

(i) लेक वाचवा.

(ii) राष्ट्रीय एकात्मता.

(iii) माझा आवडता संत.